शनिवार, ३० मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०३  अंक - २१६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 30 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-216 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05




'महाराष्ट्राचा महाकवी -2024'चे विजेते नामदेवराव चोथे यांना स्मृतिचिन्ह देताना सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव, वसंत मुंडे, डॉ. अतुल नाईक, डॉ. संजीवनी तडेगावकर, डॉ. प्रभू गोरे, सुहास पोतदार, संजय व्यापारी. सर्व छायाचित्र : सचिन उबाळे

# उत्कटपणे लिहिलेली कविता वाचकांच्या हृदयापर्यंत जाते : इंद्रजीत भालेराव

# कवी कवितेतून तर पत्रकार बातमीतून समाजाचे प्रश्न मांडतात : वसंत मुंडे

## दैनिक आधुनिक केसरी व एऑन प्ले आयोजित 'महाराष्ट्राचा महाकवी-2024'चे पुरस्कार वितरण व कविसंमेलनास रसिकांचा प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : कविता म्हणजे उत्कटपणे व्यक्त होण्याचे साधन आहे. कवीने उत्कटपणे कविता लिहिली तर ती नक्कीच वाचकांच्या हृदयापर्यंत जाते. कवींनी कविता लिहिताना ती कुणाला आवडेल का? याचा विचार न करता आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त कराव्यात, असे आवाहन सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांनी केले.**








विश्वव्यापी मराठी दैनिक आधुनिक केसरी यू-ट्यूब चॅनल व एऑन प्ले आयोजित 'महाराष्ट्राचा महाकवी -2024' या आनलाईन काव्यवाचन स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा गुरुवार, 28 मार्च रोजी कुलस्वामिनी मंगल कार्यालयात संपन्न झाला. तसेच स्पर्धेतील सहभागी कवींना सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, एऑन प्लेचे डायरेक्टर डॉ. अतुल नाईक, कवयित्री संजीवनी तडेगावकर आणि महाराष्ट्राचा महाकवी ही स्पर्धा जिंकणारे विजेते नामदेवराव चोथे यांची उपस्थिती होती.

इंद्रजीत भालेराव पुढे म्हणाले की, दैनिक आधुनिक केसरीने कविता, साहित्य प्राधान्यक्रमाने प्रकाशित करून लेखक, कवींना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, हे मी मागील काही वर्षांपासून बघतो आहे. माझे अनेक विद्यार्थी या दैनिकात लिहीत आहेत, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. आज दैनिकांमधून साहित्य लुप्त होत चालले असताना आधुनिक केसरी साहित्याला प्राधान्य देते आहे, ही खूप कौतुकास्पद बाब आहे. दीपप्रज्वलनाने या सोहळ्याचा शुभारंभ झाल्यानंतर मान्यवरांचे दैनिक आधुनिक केसरी व एऑन प्लेच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दैनिक आधुनिक केसरीचे मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे यांनी केले. तसेच या वेळी प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेत कवी, प्राध्यापक विजय पोहनेरकर, कवी विनोद जैतमहाल, कवयित्री कस्तुरी कुलकर्णी, कवी प्रशांत मुळे यांच्यासह स्पर्धेतील उत्कृष्ट कवींचे कविसंमेलन झाले. सुहास पोतदार यांनी या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले.

यावेळी पुढे बोलताना इंद्रजीत भालेराव म्हणाले की, मी तंत्रज्ञानापासून खूप दूर होतो. कोरोनापर्यंत मी मोबाईलही वापरत नव्हतो, पण लॉकडाऊनमुळे मला मला सोशल मीडियावर यावे लागले. या माध्यमातून मी जगभर पोहोचलो, आज सोशल मीडियावर माझ्या बहुतांश कविता लाखों लोकांपर्यंत पोहोचल्या आहेत. माझ्या अनेक कवितांना व महाविद्यालयात घेतलेल्या ऑनलाईन तासाला यूट्यूबवर काही दिवसांत लाखो व्ह्यूव मिळाले आहेत, ही तंत्रज्ञानाची ताकद आहे, आपण याच्या आहारी न जाता त्याचा गरजेपुरताच सदुपयोग केला पाहिजे. तंत्रज्ञानाच्या या युगातही मी मोबाईलशिवाय चार - पाच दिवस राहू शकतो. पूर्वी दिवाळीच्या आसपास लेखन करण्याची संधी होती, कारण फक्त दिवाळी अंकातूनच साहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असे, पण आता तशी कोणतीही मर्यादा राहिली नाही व लेखक दिवस-रात्र लेखन करीत आहेत, सोशल मीडियामुळे लेखन मोठया प्रमाणात वाढले आहे, ही आनंदाची बाब आहे, असे मला वाटते. यावेळी इंद्रजित भालेराव यांनी गेयस्वरूपात सादर केलेल्या 'काट्या कुट्याचा तुडवीत रस्ता', या कवितेला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेत टाळ्यांचा कडकडाट करत प्रचंड दाद दिली. 'शिक बाबा शिक लढायला शिक' या कवितेच्या लोकप्रियतेचे अनेक किस्से त्यांनी यावेळी उदाहरणासह सांगितले. खेड्यातल्या आईची कविता 'उभ्या उभ्या आड रातर येऊन जाय गं लेकी' या कवितेतून आईची मुलीबद्दल ओढ त्यांनी मांडली तर मुलगी म्हणते 'जाय तुला बोलायचं नाय, माय जाय तुला बोलायचं नाय' या मुलीच्या उत्तरातून रुसलेल्या मुलीची कहाणी त्यांनी मांडली. सर्वात शेवटी हृदयद्रावक 'दोन जीवांची माय माझी' ही त्यांच्या जन्माची कथा सांगणारी कविता श्रोत्यांचे डोळे पाणावून गेली. एका प्रेक्षकाने त्यांना ओव्या सादर करण्याची विनंती करताच भालेराव म्हणाले की, मला एवढ्या ओव्या पाठ आहेत त्या सादर करायला लागलो तर रात्रही कमी पडेल. ओव्यांमुळे जगणे कसे सोपे होते, हे त्यांनी यावेळी सांगितले. बहिणाबाईंच्या अनेक ओव्यांवर त्यांनी समीक्षण केले. पूर्वी संत अभंगातून सहजपणे शिव्या देत होते हे त्यांनी मिस्कीलपणे सांगितले, जनाबाईंचे तर शिव्यांचे अभंग आहेत हेही त्यांनी सांगताच रसिकांतून एकच हशा पिकला.

**कवी कवितेतून तर पत्रकार बातमीतून समाजाचे प्रश्न मांडतात :** कवीची कोणतीही रचना कमी–अधिक नसते. ते आपले विचार उत्कटपणे कवितेतून मांडत असतात. कवी आणि पत्रकार यांचे खूप जवळचे नाते आहे, कवी कवितेतून तर पत्रकार बातमीच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मांडत असतो. लोकशाहीचा चौथा खांब असलेली वृत्तपत्र जेव्हा खरं लिहिण्यासाठी कचरतील तेव्हा कवींनी सर्वसामान्यांच्या भावनांचा जोर आपल्या शब्दांमध्ये भरून कविता मांडली पाहिजे. असे स्पष्ट करून कविता लिहिणारे खूप झालेत पण ऐकणाऱ्याची संख्या या सोशल मीडियाच्या युगात कमी होत चालली आहे, असा माझा समज होता. पण तो मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या श्रोता वर्गामुळे खोटा ठरविला, कवितेला खूप चांगले दिवस येताहेत ही खूप सकारात्मक गोष्ट आहे, असा आशावाद महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना वसंत मुंडे म्हणाले, मी महाविद्यालयीनत असताना सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांची 'काट्या कुट्याचा तुडवीत रस्ता' ही कविता स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात ऐकली आणि या कवितेने व भालेराव सरांनी मला भारावून टाकले. यावेळी कवी प्रकाश घोडके हेही उपस्थित होते. त्यांची 'तीच्या दारावून जाताना' ही कविताही खूप गाजली होती. असे सांगत वसंत मुंडे यांनी मराठी कवितेचे महत्त्व सांगताना वेगवेगळी उदाहरणे देऊन भाष्य केले. इंद्रजीत भालेराव यांच्या दोन कवितांचे कडवेही त्यांनी सादर केले. कविता जगण्यास बळ देते यांचे मूर्तिमंत उदाहरण आपल्या समोर इथे बसलेले आहे. नामदेव चोथे इतके वयोवृद्ध असून त्यांच्या लेखणीच्या जोरावर आज महाराष्ट्राचे महाकवी हा मान मिळवतात ही खरंच खूप कौतुकास्पद बाब आहे. ते सर्व कवींसाठी एक मॉडेल रोल आहेत, असे उद्गार त्यांनी काढले. 'ती आली आणि ती गेली' या दोघांमधील अंतरातूनच कवी चा जन्म होतो. व्यवस्थे विरूद्ध उघडपणे बोलण्याची हिंमत कवीमध्ये असली पाहिजे. लोकशाहीचा चौथा खांब असलेली वृत्तपत्र जेव्हा खरं लिहिण्यासाठी कचरतील तेव्हा कवींनी सर्वसामान्यांच्या भावनांचा जोर आपल्या शब्दांमध्ये भरून कविता मांडली पाहिजे. मराठवाड्याच्या मातीतून अनेक दिग्गज कवी घडले आहेत, येथील मातीला विविध प्रकारच्या साहित्यिकांची खूप मोठी देणगी मिळाली आहे. अनेक संस्कृत व उर्दू शेरो शायरीतून वसंत मुंडे यांनी कवितेची ताकद काय असते हे विषद केले.


**प्रत्येक कवितेचे एक विशिष्ट स्थान असते :** कवितांमधून स्पर्धाच नसते, कोणतीही कविता ही विजेती किंवा उपविजेती नसते. प्रत्येक कवितेचे एक विशिष्ट स्थान असते. त्यामुळे कोणी एक विजेता व बाकी सर्व नापास, असे कोणीही समजू नये. तुम्ही सर्वच विजेता आहात, असे प्रतिपादन एऑन प्लेचे डायरेक्टर डॉ. अतुल नाईक यांनी केले. कवितेची सुरुवात महर्षी वाल्मिकी यांनी केली. त्यांनी रामायण या ग्रंथातून श्लोकांच्या रूपाने संपूर्ण रामायण लिहिले, नंतर अनेक संत साहित्य झाले, रामदास स्वामी यांनी श्लोकांतून उपदेश केले तर संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीतून जीवनाचा सर्व सार मांडला. अनेक संतांनी आपल्या रचना वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत मांडल्या. अनेक शायरांनी आपल्या शायरीद्वारे अनेकांना प्रेमात पाडले. यावेळी डॉ. अतुल नाईक यांनी अनेक संस्कृत श्लोकातून कवितेची ताकद दाखवली.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

परकीय सत्ता केवळ या प्रदेशातच नव्हे, तर लोकांच्या मनामनावर राज्य करीत होत्या. लोक गुलामगिरीने , दारिद्र्याने पिचले होते. अधर्म आणि अंधश्रद्धा बोकाळल्या होत्या. अशा वेळी कुणीतरी त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक होते. ते काम तुकोबांनी केले. अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांचा त्या वेळी लोकांच्या मनावर पगडा होता. अशा वेळी त्यांनापुण्य कशाला म्हणावे आणि पाप कशाला म्हणावे हे अगदी सोप्या शब्दात सांगितले. ते म्हणतात पुण्य पर उपकार, पाप ते परपीडा आणिक नाही जोडा, दुजा यांसी तुकोबांना भेदाभेद मान्य नव्हता. हे जगच संपूर्ण विष्णुमय आहे अशी त्यांची भावना होती. म्हणून ते म्हणतात विष्णुमय जग , वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगल. हे सगे जग त्या एका भगवंताचे आहे. आपण सर्व त्या एकाच भगवंताची लेकरं आहोत. मग जातीभेद कशाला पाहिजे ? प्रत्येक जण विष्णूचाच अंश आहे. प्रत्येकात त्याचे रूप आहे. म्हणून तर वारकरी संप्रदायात प्रत्येकाला विठ्ठलाचे रूप समजून एकमेकांना ' माऊली ' म्हटले जाते. साधू कोणाला म्हणायचे हे सोप्या शब्दात सांगताना ते म्हणतात जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ' असा हा वेदांत तुकोबांनी सोपा केला. सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत सांगितला. ' बोले तैसा चाले..' हे म्हणायला सोपे आहे पण आचरणात आणायला तितकेच कठीण. म्हणूनच जो असा बोलण्यासारखा वागेल ' त्याची पाऊले वंदावी ' असे तुकाराम महाराज म्हणतात ते उगीच नाही. त्यांच्या उक्ती आणि कृती यात अंतर नव्हते. ज्यांच्या उक्ती आणि कृतीत अंतर नाही ते संत. बाकी तुम्ही आम्ही सामान्य माणसे. तुकोबांच्या काळात प्रचंड दुष्काळ पडला होता. त्यांची सावकारी होती. अशा परिस्थितीत एखाद्याने या परिस्थितीचा फायदा घेऊन आपले सात पिढ्यांचे कल्याण करून ठेवले असते. पण तुकोबा वृत्तीने विरक्त होते. लक्ष विठ्ठलाकडे लागले होते. आणि मुख्य म्हणजे लोकांनी आपल्या अशा दुष्काळाच्या परिस्थितीत आपल्या कर्जाच्या ओझ्याखाली दबून आणखी दुःखी कष्टी व्हावे अशी त्यांची इच्छा नव्हती. म्हणून त्यांच्याकडे गहाण असलेली लोकांची कर्जखते त्यांनी इंद्रायणीच्या पाण्यात बुडवली. लोकांना कर्जमुक्त केले. किती कर्जखते त्यांनी इंद्रायणीच्या पाण्यात बुडविली असतील याची कल्पना येणार नाही.



## आनंदी पहाट

# प्रेमाचा साक्षात्कार होणे आध्यात्माचे लक्षण

आधुनिक केसरी

प्रेमाच्या प्राप्तीचीच अनेकदा उणिव असल्याचं दिसतं, त्यामुळेच समूहामध्ये, घोळक्यात, गर्दीत देखील एखादी व्यक्ती स्वतःला एकटं समजत असते. त्याउलट प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या व्यक्तीला एकटे असताना देखील मानसिक एकलेपण जाणवत नाही. प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतंच असं नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलंही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असतं असं नाही. आपलं अंतर्मन हे खरं तर प्रेमाचं प्रतिबिंब असावं, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचं खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असतं. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणं जरुरीचं असतं. जीवनाचं खरं सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेलं असतं. प्रेमासाठी तन अथवा धन नाही तर मन महत्वाचं असतं, ह्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. तेच खरं जीवनातलं सार आहे. सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते.



आधुनिक केसरी


## वाद उगा व्यर्थ | घालु नये ||

पाळावा सदैव | जगाचा रिवाज ||
पातकांशी गुज | करू नये ||१||
वाचाळ दांभिक | भेटती अनेक ||
संगती क्षणिक | करू नये ||२||
मायावी चकवे | भूलवी मनाला ||
बाधक साध्याला | ठरू नये ||३||
साधनेत रहावे | अखंड चिंतन ||
काया वाचा मन | ढळू नये ||४||
करूनिया कर्म | साधावा परमार्थ ||
वाद उगा व्यर्थ | घालु नये ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प २८वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## गुरुपीठ म्हणजे ज्ञानसाधना केंद्र


जेव्हा दृष्टीला, वाणीला, कृतीला सरस्वतीचे वरदान प्राप्त होते तेव्हा 'परब्रह्म पाहिले मी डोळां' असा आनंद-सोहळा सुरू होतो. विद्येचे लेणे अशा भावनेने ल्यायचे, हीच ज्ञानसाधना होय. अशा संशय रहित विद्या साधनेसाठी परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराजांची कृपा आवश्यक आहे. 'ज्यांच्या वरप्रसादें करून। मूढां होय शास्त्रज्ञान। त्या समर्थांचे चरण। वारंवार नमितसे।' दत्तावतारी श्री यतिराज श्री स्वामी समर्थ महाराजांच्या उपासनेने ज्ञानचक्षु उघडतात व लोककल्याणाच्या उर्मी ही कृतित्त्वात उचंबळू लागतात. त्र्यंबकेश्वर क्षेत्री साकारलेले श्री गुरुपीठ श्री स्वामी महाराजांच्या चैतन्याचे अखंड निवासस्थान आहे. दश महाविद्यांच्या तेजाचा स्त्रोत येथे नित्य प्रवाहित आहे. 'श्री' यंत्राची दैवी शक्ती येथे सामावली आहे. सेवा भावनेने, अनन्य श्रद्धेने येणार्यास येथे प्रचीती होते. हठयोगादि कठिण, असाध्य साधनेने जे अप्राप्य ते आत्मज्ञान अनुभवसिद्ध बनवण्याची किमया असलेल्या गुरुपीठाच्या प्रत्येक कणाकणात सरस्वती व्याप्त आहे. साध्या दृष्टीचा विषय असलेले नामरूपादि विश्व सोडून त्यात नित्य सामावलेले शाश्वत चैतन्य, अखंड परब्रह्मत्व शुद्ध अंतःकरणाच्या सेवेकर्याला अनुभवता यावे, त्यातून आनंदाच्या लहरी त्यास सर्वत्र प्रसारित करता याव्यात, यासाठी हे गुरुपीठ साकारले आहे. साध्या भोळ्या संसारी माणसांच्या हृदय संवेदनेशी ते जोडलेले आहे व याच माणसांच्या उद्धारासाठी सज्ज झालेले अपूर्व सिद्धपीठही ते आहे. मनःशांतीसाठी, जीवनाच्या सकारात्मक ऊर्जेसाठी, मनाच्या उन्नतीसाठी या गुरुपीठास भेट देऊन त्याच्या प्रांगणातून मनातल्या मनात ब्रह्मगिरीला साद द्या; शिवरूप व गुरुरुपाच्या अद्वैताची प्रचीती अनुभवा.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्तःकरण विलीन है,
त्याग सकल व्यवपार ।
ज्ञान घोरतम छाइया, भाव सुषोप्ति विचार
।।३०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/३०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
समस्त व्यवहार बंद करून जेव्हा अंतःकरण आपल्या मूळ स्वरूपात विलीन होतात आणि जीवात्म्याचे ज्ञान घोर तमोगुणाने झाकले जाते, त्या अवस्थेला सुषुप्ती अवस्था म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

आधुनिक केसरी

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, ' मुलाचे प्रेम कसे येईल ?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत,



तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात्, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे. ७. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तशीच अनुभवायला मिळते. अनंत नामरूपानी भरलेले हे चराचर विश्व त्याला परब्रम्हाची "स्वानंदलीलाच"वाटते. मायेच्या प्रभावाने फसून जाऊन तो आत्मस्वरूपाला विसरत नाही आणि द्रुश्याला खरेपणा देत नाही. परंतु मायेच्या आधीन होऊन अज्ञानामध्ये जगणारा जीव स्थलकालाच्या बंधनात अडकतो. त्यामुळे आत्मस्वरूप तो विसरतोच पण त्याचबरोबर चराचर विश्व संपूर्ण सत्य मानतो. आत्मज्ञानाच्या द्रुष्टीने विचार केला तर ब्रम्ह आणि त्याची शक्ति माया दोन्ही अगदी एकरूपचं आहेत.



कवी संमेलनाचे उद्घाटन करताना वसंत मुंडे, डॉ. अतुल नाईक, डॉ. संजीवनी तडेगावकर, विजय पोहनेरकर, प्रशांत मुळे, विनोद जैतमहाल, कस्तुरी कुलकर्णी, नामदेवराव चोथे, डॉ. प्रभू गोरे

# बहारदार कविसंमेलनाला रसिकांचा टाळ्यांच्या कडकडाटात प्रचंड प्रतिसाद

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेत कवी, प्राध्यापक विजय पोहनेरकर, कवी विनोद जैतमहाल, कवयित्री कस्तुरी कुलकर्णी, कवी प्रशांत मुळे यांच्यासह स्पर्धेतील उत्कृष्ट कवींचे कविसंमेलन झाले. यावेळी प्रा. विजय पोहनेरकर यांनी हरवत चाललेल्या सायंकाळचे वर्णन आपल्या गेयकवितेतून सादर केले. तर कवी प्रशांत मुळे यांनी महिलेचे भाव विश्व उलगडून दाखविणारी कविता सादर केली. कवी - पत्रकार विनोद जैतमहाल यांनी सध्याच्या राजकारणावर प्रखर आसूड ओढणारी कविता सादर करून प्रेक्षकांची वाहवाह मिळविली

कवयित्री कस्तुरी कुलकर्णी यांनी सादर केलेल्या कवितेने काहीवेळ प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कवी संमेलनाच्या अध्यक्षा प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी यावेळी सादर झालेल्या कवितांवर भाष्य करत गद्य आणि पद्याचा समन्वय साधत कविता कशी लिहावी, हे उदाहरणासह सांगितले. त्यांनी सादर केलेल्या गेय कवितेला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. शेवटी 'महाराष्ट्राचा महाकवी -2024' या आनलाईन काव्यवाचन स्पर्धेतील विजेते कवी नामदेव तुकाराम चोथे यांनी 'दारूचा परिणाम' ही कविता सादर केली. यावेळी दैनिक आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, सह संपादक सुधीर कोर्टीकर, जाहिरात व्यवस्थापक संदीप घंटे, अतुल खंडगावकर, प्रा. डॉ. प्रकाश खेत्री, गझलकार गिरीश जोशी, संपादक सुधाकर जेठे, विलास शिंगी, ओंकार कस्तुरे, अंजली कस्तुरे, मुकेश मुंदडा, अंजली मुळे, प्रशांत मुळे, नयन कोर्टीकर, मनोज पाटणी, सौ.अंजली पोहनेरकर, संध्या जोशी, सहशिक्षक लक्ष्मण जांभळीकर, सहशिक्षक दत्तात्रय वाघमारे, नारायण गोरे, शिवाजीराव धात्रक, विजय जोग, डॉ.शामसुंदर कुडे, सौ.सुनीता कुडे, भावना कुडे, खुल्लर, गणेश महाजन, जगत, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी, सुनील चव्हाण, बाळासाहेब करपे, नागोराव हेमके आदींसह कवीप्रेमींची यावेळी उपस्थिती होती.


वसंत मुंडे यांचे स्वागत करताना सुधीर कोर्टीकर


अतुल नाईक यांचे स्वागत करताना संजय व्यापारी


डॉ. संजीवनी तडेगावकर यांचे स्वागत करताना सौ. सोनाली गोरे


वैभव स्वामी यांचे स्वागत करताना विलास शिंगी


विलास कोरडे यांचे स्वागत करताना मुकेश मुंदडा


विजय पोहनेरकर यांचे स्वागत करताना अतुल खंडगावकर


विनोद जैतमहाल यांचे स्वागत करताना अक्षय मिटकरी


कस्तुरी कुलकर्णी यांचे स्वागत करताना मायावती


प्रशांत मुळे यांचे स्वागत करताना संदीप घंटे

## भागवतांचा इशारा

आधुनिक केसरी

राष्ट्रीय स्वयंसवेक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी राज्यकारभार करणाऱ्या राजाचे वर्तन कसे असावे, यावर महत्त्वाचे विधान केले आहे. मुंबईच्या विले



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# निवडणूक घेण्याचा उद्देश काय?

आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणुकी सोबतच अनेक राज्यात विधानसभा निवडणुक सुद्धा आहे. निवडणूक हि लोकशाही मध्ये अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असुन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक ही पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्भिड होणे आवश्यक आहे. नागरिकांचा सर्वोत्तम अधिकार म्हणजे मताधिकारा द्वारा जनतेचे कोणते प्रतिनिधी सभागृहात पाठवायचे आणि कोणते भ्रष्ट, अकार्यक्षम आणि नितीहीन लोकांना दुर सारायचे हे सर्व जनता निवडणुकीच्या माध्यमातून ठरवत असते. जनतेची मते घेऊन निवडणूक जिंकता यावी म्हणून उमेदवारांना आपापल्या मतदार संघात चांगले काम करून जनकल्याणावर भर द्यावा लागतो.**

जनकल्याण या संकल्पनेत मुलभूत सुविधा सह आरोग्य, शिक्षण, रोजगार, महागाई नियंत्रण, शेतमालाला भाव, महिलांचे प्रश्न, मजुरांचे प्रश्न असे वेगवेगळे मुद्दे येत असतात. सरकारने जनकल्याचे काम करावे जर सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर लोकप्रतीनीधी मार्फत समस्या सरकार दरबारी मांडल्या जातात आणि लोकप्रतिनिधी मार्फत सरकार कडून समस्या सोडवून घेतल्या जातात. जनता आणि सरकार यांच्या मधला दुवा म्हणजे लोकप्रतिनिधी असतो. लोकप्रतिनिधी किंवा सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर ते काम करण्यासाठी दबाव, काम न केल्यास त्यांच्या कामावर संविधानीक मार्गाने टिका करण्याचा अधिकारही जनतेलाच आहे. लोककल्याणाचे काम होत नसतील तर आंदोलन, निदर्शने आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्याचाही अधिकार जनतेला आहे. जनता हि लोकशाही मध्ये सर्वश्रेष्ठ असुन जनतेच्या सेवेसाठी सर्व यंत्रणा काम करत असते. मताधिकार हा जेवढा लोकशाही मध्ये महत्त्वाचा घटक आहे तेवढाच अजून एक घटक महत्त्वाचा आहे तो म्हणजे बहूपक्षीय मान्यता. आपल्या देशात बहुपक्षीय लोकशाही आहे. याचे कारण असे की सत्ताधारी पक्षाने जनकल्याणाचे काम केले नाही तर दुसऱ्या पक्षाला सत्तेत जाण्याची संधी जनता देते.

दुसऱ्या पक्षाचे जनकल्याणाचे काम केले नाही तर तिसऱ्या पक्षाला जनता सत्तेत जाण्याची संधी निर्माण करून देते. हे लोकशाही चे वैशिष्ट्य आहे. सत्ताधारी पक्षासोबत विरोधी ही पक्षही मजबूत असणे हे लोकशाही जिवंत असण्याचे लक्षण आहे. कारण सत्ताधारी पक्ष सत्तेचा गैरवापर करून जनकल्याणाच्या विरोधात काम करू नये, सरकारने योग्य व पारदर्शक कामे करून जनतेचे प्रश्न वेळेत सोडवण्यासाठी व त्यावर लक्ष ठेवून सत्ताधारी पक्षाकडून ते दबाव टाकून करून घेण्यासाठी विरोधी पक्ष मजबूत असणे आवश्यक असतो. सरकार ला प्रभावशाली काम करून जनकल्याण करून जनतेचा विश्वास व लोकशाही टिकवायची असेल भ्रष्टाचारी, व्याभिचारी नेत्यांवर वचक बसावा म्हणून स्वायत्त संस्था आहेत. स्वायत्त संस्थेच्या कामामध्ये हस्तक्षेप करण्याचा सरकारला कोणताही अधिकार नाही. स्वायत्त संस्थांनी सरकारच्या दबावाखाली न येता प्रामाणिक काम केले तर देशातील भ्रष्टाचार, व्याभिचार आणि गुन्हेगारी दूर व्हायला वेळ लागत नाही. लोकांचे जिवन सोन्यासारखे बनवणारी लोकशाही धुर्त व विषमता वादी लोकांच्या तावडीत सापडली. आणि जे संविधान कामे लोकशाही व लोककल्याणाचे आहेत ते न होता विशिष्ट वर्गाला श्रीमंत करून, एकाच वर्णाची पुन्हा सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. न्यायालयातील न्यायधीश रस्त्यावर येऊन पत्रकार परिषद घेऊन आम्हाला काम करू दिले जात नाही असे सांगत असतील तर सरकार किती खालच्या पातळीवर जाऊन लोकशाही नष्ट करायला लागले याची प्रचिती येते. जनकल्याणाचे काम होण्या ऐवजी जनतेला उद्ध्वस्त करण्याचे काम येथे होत आहे. जनता शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधेसह मुलभूत सुविधा मागणी करत असताना सरकार मंदिराचे भावनिक गाजर दाखवून वरिल मुद्यावर पडदा टाकुन मुद्दा च नसलेल्या मुद्याला समोर करत आहे. सरकारशी इमानदार राहून आपला स्वाभिमान राजकीय पक्षाच्या पायावर ठेवणारे प्रसारमाध्यमे श्रद्धेचे व धर्माचे भांडवल करून एकाच वर्णाच्या लोकांची झोळी भरून जनतेला मुर्खात काढत आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब असुन तिला निवडणूक अजेंडा बनवून सार्वजनिक केले जात असेल तर हे लोकशाही साठी आणि लोकांच्या कल्याणासाठी घातक आहे. जनमताने सरकार निर्माण होत असते परंतु येथे इव्हिएमच्या माध्यमातून जनमत शुन्य करून लोकशाहीची हत्या सुरू आहे. राजकीय पक्षासह जनत आम्हाला इव्हिएम नको म्हणून देशभर करोडोच्या संख्येने रस्त्यावर उतरत आहे. निवडणूक हि जनतेला पाहिजे तशी होणे आवश्यक आहे. पक्षाच्या व सरकारच्या मताने निवडणूक होत नसते. जनता एव्हीएम विरोधात असताना सरकार इव्हिएमद्वारेच निवडणूक घेण्यासाठी आग्रही का असेल? अनेक जाणकार लोकांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून ईव्हीएम घोटाळा उघड केला. जेथे लोकांच्या मताची चोरी करून सरकार येत असेल तेथे लोकांची व लोकशाही ची कामे कशी होतील? निवडणूक कशी घ्यायची हा प्रश्न जनतेचा आहे.

सरकारने जनमत लक्षात घेऊन कायदा करावा आणि निवडणूक आयोगाने सरकारच्या हस्तक्षेप विरहित पारदर्शक व विश्वासार्ह निवडणूक घ्यावी. परंतु येथे लोक निवडणूक आयोगा विरोधात आंदोलन मोर्चे करत असताना इव्हिएम विरोधात जे काही सामाजिक माध्यमांवर लोकांनी सामाईक केले आहे ते काढून टाकण्याचे आदेश देणे म्हणजे अभिव्यक्ती स्वांतत्र्याची गळचेपी करणे होय. अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वाद हा निवडणूक आयोग आणि जनता यांचा असुन सरकार जनतेवर कडक कारवाई करण्याचे आदेश देत असेल तर सरळ सरळ आहे. इव्हिएमच्या माध्यमातून सरकार स्थापन होते. जनतेच्या मताची सरकार स्थापन करायला गरज नाही म्हणून सरकार इव्हिएम विरोधात बोलणाऱ्यावर कारवाई केली जाईल अशी भाषा बोलते. जर जनतेच्या मताची गरज सरकार स्थापनेसाठी लागली असती तर सरकारची जनतेवर कारवाई करा अशी बोलण्याची हिंमतच झाली नसती. सरकार विरोधात बोलणाऱ्यांना धर्मविरोधी म्हणून घोषित केले जाते. जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून माणसाला अडचणीत टाकले जाते. सरकार विरोधात जास्तच बोलले लिहले तर तुरुंगात टाकले जाते. भ्रष्टाचारी नेत्यांना इडीची धमकी देऊन आपल्या पक्षात घेऊन त्याला भ्रष्टाचार मुक्त करून मंत्री बनवले जाते. जो पक्षात आला नाही त्याच्या वर वेगवेगळ्या माध्यमातून दबाव आणला जातो. जागतिक स्तरावर नाव लौकीक केलेल्या महिला सत्ताधारी खासदारावर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल करतात तेव्हा खासदाराचे निलंबन करून कार्यवाही न करता जागतिक पातळीवरील देशाचे नाव गाजवलेल्या महिलांनाच बदनाम केले जाते. जागतिक पातळीवरील महिलांचे हे हाल असतील तर मनिपूर सारखे प्रकरण कितीतरी होत असतील. विरोधी पक्ष नष्ट करून पैसा, सत्तेची शक्ती या जोरावर विरोधी पक्षातील भ्रष्ट नेत्याची बोली लाऊन त्यांना श्रेष्ठ केले जाते. विद्यार्थी, शेतकरी, महिला न्यायासाठी रस्त्यावर उतरल्यातर त्यांच्या वरच अन्याय केला जातो. प्रसार माध्यमांना हाताशी धरून प्रसारमाध्यमांना पक्षाचे प्रवक्त्याचे काम दिले जाते. सर्वसामान्य व सरकार विरोधात बोलणाऱ्यांवर देशद्रोहाचे खटले भरले जातात तर देशाची दिशाभूल करणाऱ्यांना, देशाची गुप्त माहिती शत्रु देशाला देणाऱ्या खऱ्या देशद्रोही लोकांना पाठीशी घातले जाते. शिक्षण, रोजगार बंद करून शासकीय मालमत्तेचे खाजगीकरण केले जाते. आणि लोकांना आरक्षणासारख्या मुद्द्यांवर लढवले जाते. खाजगीकरणातुन, जुलमी करांतुन नोकरीभरती कपात करून, शैक्षणिक खर्च कमी करून, विदेशी लोन घेऊन मिळवलेला पैसा खर्च कुठे होतो हे विचारणे गुन्हा ठरत आहे. थोडक्यात देशात नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर बंधने लादुन त्यांना दोषी ठरवण्यात येत आहे, न्याय हक्का साठी लढणाऱ्यांना नक्षलवादी आणि भ्रष्टाचार केलेल्या नेत्यांनी पक्ष प्रवेश केला तर त्यांना भ्रष्टाचार मुक्त करून जबाबदारी ची पदे दिली जातात. लोकशाही मोडकळीस काढणाऱ्यांना सत्तेत तर तर लोकशाही टिकवण्यासाठी लढा देणाऱ्यांना, इव्हिएमच्या विरोधात आंदोलन करणाऱ्यांना तुरुंगात टाकले जात आहे. इव्हिएम मध्ये घोटाळा करून, लोकशाही ची हत्या करून मोक्याच्या पदावर बसलेल्या लोकांना संरक्षण दिले जाते. धर्माच्या नावाखाली कर्म लपवून धर्माला बदनाम केले जाते. देशातील प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांना सरकारच्या चुकीच्या धोरणाचा त्रास सहन करावा लागत असुन ही येणाऱ्या निवडणूका पारदर्शक व निष्पक्ष होणार नाही हे लहानातील लहान मुलही बोलायला लागली. इव्हिएम बणवणाऱ्या कंपनीच्या संचालक पदी सत्ताधारी लोकच नियुक्त होत असतील तर लोकांचा इव्हिएम व निवडणुकीवर विश्वास कसा निर्माण होईल? जर जनतेच्या मताला डावलून, लोकशाही ची हत्या करून निवडणूक आयोग निवडणूक घेत असेल तर ती निवडणूक घेण्याचा उद्देश तरी काय? अगोदरच कर्जाच्या ओझ्याखाली देश दबलेला आहे आणि इव्हिएमच्या माध्यमातून एकतर्फी निकाल द्यायचा आणि लोकांच्या मताची किंमत शुन्य करायची तर पुन्हा निवडणूक घेण्याच्या नाटकासाठी करोडो रुपये खर्च करण्याची गरजच काय? आज लोकशाही सह लोकांचे हक्क अधिकार धोक्यात आले आहेत याचे एकमेव कारण म्हणजे लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान कधी वाचलेच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांना एकाच धर्माची संपती समजून कायम विरोध करून मनातून तिरस्कार केला म्हणून आज हि परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाला देशातील लोकांना पुन्हा एकदा सोन्याचे दिवस पाहिजे असतील तर डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान समजून घेणे गरजेचे आहे. जोपर्यंत संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेणार नाही तो पर्यंत नागरिक हक्क अधिकारां बाबत जागृत होणार नाही. आणि लोकशाही मध्ये राजाच अर्थात जनताच जागृत नसेल तर तेथे लोकशाही ची हत्याच होणार. लोकशाहीचे जतन करण्यासाठी लोकशाही मध्ये नागरिक जागृत पाहिजे. परंतु लोकांना अज्ञानात व जाती धर्मात अडकवून राजकीय झोळी भरण्याच्या नादात लोकशाही धोक्यात आली आहे.



जगन घाणेकर
मो. ९६६४५५९७८०

# कामचुकारांना अद्दल घडवायलाच हवी !

आधुनिक केसरी

**विद्यार्थ्यांनी एका शिक्षकाला चपलांनी चोप देत वर्गातून हाकलून लावल्याची घटना छत्तीसगढ मधील बस्तर या ठिकाणी एक शाळेत घडली. सदर घटनेचा व्हिडीओ सध्या सामाजिक माध्यमांतून प्रचंड व्हायरल होत आहे. हा शिक्षक प्रतिदिन दारू पिऊन यायचा आणि वर्गात झोपायचा. घटनेच्या दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षकाला तास घेण्यास सांगितले तेव्हा शिक्षकाने विद्यार्थ्यांना घाणेरड्या शिव्या देण्यास सुरुवात केली. तेव्हा वर्गातील समस्त विद्यार्थ्यांनी मिळून त्या शिक्षकाला चपलांनी चोप दिला. शाळेसारख्या पवित्र जागी जिथे विद्यादानाचे कार्य चालते, जिथे शालेय अभ्यासक्रमासह मुलांना नैतिकतेचे धडे जातात.**

देशाचा आदर्श भावी नागरिक बनण्यासाठी विद्यार्थ्यांवर संस्कारांची पाखरण केली जाते अशा पवित्र जागेवर दारू पिऊन येणाऱ्या आणि विद्यार्थ्यांना घाणेरड्या शिव्या देणाऱ्या शिक्षकाच्या बाबतीत जे झाले ते योग्यच झाले, अशी प्रतिकिया समाजातून व्यक्त केली जात आहे. शिक्षक प्रतिदिन शाळेत दारु पिऊन येत असताना शाळा प्रशासन झोपा काढत होते का ? असा संतप्त सवालही सामाजिक माध्यमांतून विचारला जात आहे त्यामुळे शिक्षकाला पाठीशी घालणाऱ्या शाळा प्रशासनावरही कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. विद्यादानासारखे पवित्र कार्य करण्याचे दायित्व असणाऱ्या शिक्षकाने शाळेत दारू पिऊन झोपा काढणे ही पराकोटीची कामचुकारता तर आहेच शिवाय माझे कोणी वाकडे करू शकणार नाही हा माजही त्यामध्ये दडलेला आहे. हा माज उतरवणारे विद्यार्थी अभिनंदनास पात्र आहेत. आपल्याला नेमून दिलेल्या कामाच्या मोबदल्यात आपल्याला मासिक वेतन मिळत असते. त्यामुळे आपल्याला नेमून दिलेल्या कामाशी प्रामाणिक राहून, आपल्या कौशल्याचा वापर करून नागरिकांना सेवा देणे हे सेवा उपक्रमाशींL निगडित असलेल्या कर्मचाऱ्यांचे कर्तव्यच आहे. आपले कर्तव्य सोडून कामाच्या वेळेत आपले वैयक्तिक काम करत राहणे, कामाच्या वेळेत जागेवर उपस्थित ना राहणे, सहकर्मचाऱ्यांशी गप्पा मारण्यात वेळ वाया घालवणे, नागरिकांना ताटकळत ठेवणे, वेळेत काम करण्याचा मोबदल्यात लाच मागणे, लाच ना देणाऱ्याला कार्यालयात पुन्हा पुन्हा चकरा मारावयास लावणे यांसारखे प्रकार सरकारी कार्यालये, पोलीस स्थानके, रुग्णालये, बँका यांसारख्या ठिकाणी सर्रास घडताना दिसतात. वाद टाळण्याच्या दृष्टीने आणि आपल्या कामात आडकाठी नको म्हणून बऱ्याचदा आपण या कामचुकारांना विरोध करणे टाळतो. परिणामी यांना कामात टाळाटाळ करण्याची सवय लागून एक प्रकारचा माज चढतो. हा माज कसा उतरायचा याचा धडा छत्तीसगढ मधील विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे. हे विद्यार्थी सदर शिक्षकाला प्रतिदिन सहन करत होते अखेर सहनशक्ती मर्यादेपलीकडे गेल्याने त्यांनी पुढचे पाऊल उचलले. सरकारी कार्यालयातील कामचुकारांना जनता एका मर्यादेपलीकडे सहन करेल, वरिष्ठांकडे तक्रार करेल आणि त्यातूनही काही सुधारणा न झाल्यास येणाऱ्या काळात बस्तर येथील विद्यार्थ्यांप्रमाणे पुढचे पाऊल उचलेल हे सेवा उपक्रमाशी निगडित विभागात कार्य करणाऱ्या कामचुकार आणि मुजोर कर्मचाऱ्यांनी लक्षात घ्यावे !



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

**महाराष्ट्राचा महाकवी 2024 स्पर्धेतील सहभागी कवींनी बहारदार कविता सादर करून प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. यावेळी व्यासपीठावर मान्यवर कवींनीही या कवींच्या कवितांना उत्स्फूर्त दाद देत त्यांचा उत्साह वाढविला.**














हनहुन्नरी कलाकार सुधीर कोर्टीकर यांनी काढलेल्या मनमोहक रांगोळीचे बारकाईने निरीक्षण करून कौतुक करताना मान्यवर. सोबत सौ. नयन सुधीर कोर्टीकर.

# महाराष्ट्राचा महाकवी 2024 स्पर्धेतील सहभागी कवींना सन्मानपत्र बहाल करताना सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव, वसंत मुंडे, डॉ. अतुल नाईक, डॉ. संजीवनी तडेगावकर






















# वंचित कोणाला सत्तेपासून वंचित ठेवणार ?

आधुनिक केसरी

चंद्रपूर लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये होणारी कुठलीही निवडणूक मग ती लोकसभा असो अथवा विधानसभा ही थेट निवडणूक असते . ज्यात काँग्रेस आणि भाजप परस्पर विरोधी पक्ष म्हणून एकमेकांसमोर उभे ठाकलेले असतात . या दोन पक्षांमध्येच चंद्रपूरची प्रत्येक निवडणूक ही थेट निवडणूक झालेली आहे . 2024 ची



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

होणारी निवडणूक ही सुद्धा अशीच थेट लढत होणार आहे यात शंकाच नाही . परंतु यावर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निवडणूक ही अतिशय अटीतटीची लढत होणार असून यातील एक एक मत दोन्ही पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचे राहणार आहे . या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार किती मत घेत कोणाला सत्तेपासून दूर ठेवणार ? हा प्रश्न मात्र आता चंद्रपुरात चर्चिल्या जात आहे.

2019 च्या निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राजेंद्र महाडोळे यांनी 1 लाख 11 हजार 547 मते घेत तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली होती . या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांनी हंसराज अहिर यांचा अवघ्या 44 हजार मतांनी पराभव केला होता. जेव्हा एखाद्या उमेदवाराचा अवघ्या 44,000 मताने पराभव होतो तेव्हा ह्या अशा विभाजित झालेल्या मतांच काय मूल्य असतं ? ते त्या विजयी आणि पराभूत उमेदवारलाच माहीत असतं . एवढेच काय ते वंचित बहुजन आघाडीच या निवडणुकीतलं महत्त्व. यावर्षी सुद्धा चंद्रपूरमध्ये काँग्रेसच्या तिकिटावर लढणाऱ्या व इंडिया आघाडीच्या उमेदवार असलेल्या प्रतिभा धानोरकर यांची थेट लढत ही भारतीय जनता पार्टीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्याशी होणार आहे .




या निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीने राजेश बेले यांना उमेदवारी दिलेली आहे . राजेश बेले यांचं







चंद्रपुरातील कोणत्याही क्षेत्रात योगदान दिसत नाही . सामाजिक , सांस्कृतिक , शैक्षणिक किंवा राजकीय अशा कुठल्याही क्षेत्रात त्यांचा कधीही वावर दिसत नाही . वंचित बहुजन आघाडीने तेली समुदायाच नेतृत्व म्हणून कदाचित राजेश बेले यांना उमेदवारी दिली आहे असं म्हणायला गेलं तर तेली समाजामध्ये सुद्धा राजेश बेले यांचं कुठलंही अस्तित्व आजवर दिसलेलं नाही . वक्तृत्व , नेतृत्व , कर्तृत्व अशा कुठल्याही बाबतीत ते आजवर कधी चर्चेतही राहिलेले नाहीत . केवळ बॅनरबाजी आणि पोस्टर लावण्या मध्ये मात्र राजेश बेले हे बरेचदा आघाडीवर राहिलेले आहेत . त्यामुळे एकूणच वंचित बहुजन आघाडीची भूमिका या निवडणुकीमध्ये नेमकी काय राहील ? आणि वंचित बहुजन आघाडीने घेतलेली मते ही नेमकी कोणाच्या पथ्यावर पडणार ? हा एक प्रश्न आहे . कारण काँग्रेसच्या उमेदवारीच्या धुमश्चक्रीमध्ये तेली समाजाने स्वतंत्र बैठक घेत काँग्रेसने दोन दिवसात उमेदवारी जाहीर करावी अन्यथा आम्हाला वेगळी भूमिका घ्यावी लागेल असं विधान केलेलं होत या बैठकीला प्रकाश देवतळे आणि विनायक बांगडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती . त्यामुळे तेली समाज नेमकी कोणती भूमिका घेणार ? वंचित बहुजन आघाडीचे राजेश बेले यांच्या पाठीमागे तेली समाज खरोखरच उभा राहील का ? आणि राजेश बेले यांनी घेतलेली मते ही काँग्रेसच्या पथ्यावर पडेल की भाजपच्या पथ्यावर पडेल ? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे . 2019 च्या निवडणुकीमध्ये एडवोकेट राजेंद्र महाडोळे यांनी तिसऱ्या क्रमांकाची मते घेतलेली होती यावेळेस वंचित बहुजन आघाडीने जाहीर केलेले उमेदवार राजेश बेले हे किती मत घेतील आणि कोणत्या स्थानावर राहतील आणि याचा फटका कोणत्या पक्षाला बसेल हे ४ जून लाच कळणार आहे.

## भाविकांना सोई सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषद सज्ज : मुख्याधिकारी संतोष आगळे

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** संत एकनाथ महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्ताने राज्यातील लाखो वारकरी भाविक पैठणला तीन दिवशी मुक्कामी येत असतात. यानिमित्ताने शासनाच्या माध्यमातून नगर परिषद पैठण वारकर्यांनसाठी दर वर्षी या सुविधा पुरवते गावातील नाथमंदीर, बाहेरील नाथमंदीर व यात्रा कॅम्पवरील न.प.च्या कार्यालयास मंडप पुरवठा, लाऊडस्पिकर, स्टेज, सतरंजी, खुर्ची, टेबल, मॅट, जनरेटर व आवश्यक त्याठिकाणी लाईटची व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. मंदीर प्रवेशव्दार व इतर पाच ठिकाणी बॉक्स कमानी उभारणे, स्मरणीका व दुरध्वनी पुस्तीका छपाई करुन वारकऱ्यांना देणे, स्वच्छता विभागास लागणारे साहित्य पुरवठा करणे (खराटे, लोखंडी व प्लास्टिक टोपले, फावडे, टिकाव व सुरक्षा विषयक साहित्य हॅन्डग्लोज, जाकिट, हेल्मेट सब्बल व गमबुट वाळवंट व पालखी रस्त्यावर प्रत्येक पोलवर एल.ई.डी. लाईट फोकस सह 10 ठिकाणी तात्पुरते हायमास्ट उभारणे ,1000 शौच खड्डे करणे व स्वच्छतेची व्यवस्थाकरणे, फिनेल पुरवठा करणे (उच्च दर्जाचे व आय.एस.ओ. प्रमाणित असावे) गॅमेझिंग पावडर व कार्बोरिक पावडर पुरवठा करणे (उच्च दर्जाचे व आय.एस.ओ. प्रमाणित असावे ). अधिकारी , कर्मचारी व सेवेकरी यांच्या करीता जेवण पुरवठा करणे ( ताटामध्ये या पदार्थांचा जेवणाचा समावेश असवा . पोळी , भात , वरण , दोन भाज्या ई . ) यात्रा कॅम्पवर चहा , नाश्ता पुरवठा करणे. यात्रे निमित्त संपुर्ण शहरात जंतुनाशक व रोग प्रतिबंधक फवारणी करणे. काल्याचे थेट प्रेक्षपण करण्यासाठी स्क्रीन 8 X 12 फुट फुल एचडी स्क्रीन(6) ठिकाणी लावणे,भाविकांना आवाहन करण्यासाठी फलक फ्रेमसह पुरवठा करणे व उभारणी करुन देणे , जायकवाडी येथील प्युअर वॉटर व रॉ वॉटर पंपहाऊस दुरुस्ती करणे, 40 ठिकाणी सि.सि.टी.व्ही . कॅमेरे बसविणे सर्व कॅमेरे क्षमता उच्च दर्जाचे असावेत . तसेच मॉनिटरींग स्क्रीन 42 इंच किंवा त्यापेक्षा मोठया आकाराची असावी व त्याचे प्रक्षेपण न.प.च्या नियत्रंक कक्षात असावे व डाटा सेव्ह करणे, आवश्यक त्या ठिकाणी रंगरंगोटी करणे, ॲलम ,ब्लिचींग पावडर पुरवठा करणे ,5000 लिटरचे पिण्याचे पाणी टँकर भाडेतत्वावर पुरवठा , फोटो व व्हीडीओग्राफी 02 ड्रोन कॅमेरासह ( तीन दिवसा करीता ) करणे यात्रा कालावधीतील तीन दिवसाचा फोटाचा एक उच्च प्रतिचा अल्बम तयार करुन देणे व व्हिडीओग्राफीची डी.व्ही.डी करुन देणे, विद्युत व्यवस्था करण्यासाठी विद्युत साहित्य पुरवठा करणे, यात्रा मैदान , पालखी रस्ता व पैठण शहरातील इतर रस्ते इ . ठिकाणी 06 एम . एम . | खडी पुरवठा करणे व पसरविणे , लेव्हलिंग ट्रॅक्टर पुरवठा करणे . डिझेल व ऑपरेटर इत्यादीसह पुरवठा करणे व आवश्यक त्या ठिकाणी कामे करणे . यात्रा मैदान , पालखी रस्ता व पैठण शहरातील इतर रस्ते इ . ठिकाणी मुरुम पुरवठा करणे व परसविणे, यात्रा काळात स्वच्छतेसाठी व इतर अनुषंगीक कामासाठी मजुर पुरवठा करणे, यात्रा करीता 300 फिरते शोचालय पुरवठा करणे , SLUDGE MACHINE ची व्यवस्था करणे . वाहनांची वाहतुक करणे, पाण्याची व्यवस्था करणे व सदरील ठिकाणी आपले कर्मचारी उपलब्ध करुन देणे इत्यादी पुर्ण व्यवस्था करणे, गोदावरी पात्रातील (वाळवंट ) चिंध्या उचलणे व शेवाळ काढणे जल ड्रोप (क्लोरीन ड्रोप ) पुरवठा करणे, यात्रे मध्ये जेवणाच्या पत्रावळी उचलण्यासाठी गारबेज



बॅग पुरवठा करणे ( 50 मायक्रॉन च्या वर आसाव्यात व MPCB कडुन प्रमाणित व नोंदणीकृत असाव्यात ) पब्लिक अनाऊन्समेंट व्यवस्था करणे . ( 40 भोंगे सर्व सुविधेसह ) स्वच्छतेच्या कामासाठी 2 ट्रॅक्टर व ऑपरेटर सह व डिझेल सह पुरवठा करणे ,यात्रा निमित्ताने भाडे तत्वावर वॉकी टॉकीचे 12 संच सेल सह पुरवठा करणे ,ढापे तयार करणे ,मोक्षघाट फरशी पुरवठा करणे ( फिटींग सह ) , पाणी पुरवठा वितरण नलिका लिकेज दुरुस्ती करणे , यात्रा काळात मोक्ष घाटावर मॅटींग टाकणे,यात्रा काळात सॅनिटायजर खरेदी करणे यात्रा काळात मास्क खरेदी करणे यात्रा काळात शहरातील मुख्य नाले सुफाई करणे 1 ) कहारवाडा येथील मुख्य नाला 2 ) बस स्टॅन्ड मागील बाजु ( तहसिल रोड ) ते डॉ . आंबेडकर पुतळा त 3 ) सराफनगर व शशी विहार येथील मुख्य नाला नविन कावसान येथील मुख्य नाला 4 ) 5 ) धनगरवाडा सार्वजनिक शौचालय ते गोपाल नगर ते सिध्देश्वर रोड पर्यंत 6 ) कन्या शाळा , लहुजी नगर ते गागाभट्ट चौक ते गोदावरी पात्रा पर्यंत 7 ) ग्रिन चौक ते मौलाना साहब दर्गा पर्यंत 8 ) पंचायत समिती मागील नाला ते वखार महामंडळ ते उद्यान रोडपर्यंत, बायोकल्चर पुरवठा करणे, स्मृती चिन्ह पुरवठा करणे. ईत्यादी सुविधा नगर परिषद कडुन नाथषष्टी यात्रा काळात लाखोंच्या संख्येने येत आसलेल्या वारकरी व भाविकांना सोई सुविधा देण्यासाठी नगरपरिषदे पैठण सज्ज झाली असुन यात्रा काळात या सोई सुविधा कटाक्षाने वारकऱ्यांना मिळाव्या या उद्देशाने मुख्याधिकारी संतोष आगळे हे लक्ष ठेवुन आहेत. वारकर्यांना पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा प्रमुख व्यंकटी पापुलवार यांच्या सह शहरातील स्वच्छता ठेवण्यासाठी स्वच्छता प्रमुख धर्मराज उजगरे,अशोक पगारे,अशोक मगरे,अमोल शेजुळ, सुरेश नवगिरे,पाटीलबा घुले सह कर्मचारी लक्ष ठेवून आहेत.

## मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारत निवडणूक आयोगाने 16 मार्च 2024 रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यातील लोकसभा मतदारसंघात दि. 19 एप्रिल, दि. 26 एप्रिल, दि. 7 मे, दि. 13 मे व दि. 20 मे 2024 अशा पाच टप्प्यात मतदान होणार आहे. यातील चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात 19 एप्रिल 2024 रोजी पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. 18 वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोग यांच्या 22 मार्च 2024 च्या परिपत्रकानुसार चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात 19 एप्रिल रोजी मतदान करण्यास सुटी जाहीर करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सुट्टी देण्यात येते किंवा कामाच्या ठिकाणी योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये संस्था ,खासगी आस्थापना इत्यादी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागते. हे लक्षात घेता, या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे.

ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणारे सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांना या सूचनांचे योग्य अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे. मतदानाच्या हक्कापासून कोणताही शासकीय कर्मचारी वंचित राहू नये, याकरिता निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने निवडणुकीच्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे. तसेच कार्यालय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, व्यावसायिक संस्था, व्यापारी केंद्र, औद्योगिक कारखाने इत्यादीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्याचे देखील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सूचित केले आहे.

## फर्दापूर येथील शेतातील वासरावर बिबट्याने चढविला हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील शेतातील गोठ्यावर हल्ला करून गोठ्यात बांधलेल्या संकरित गायीच्या वासराला ठार केले. गुरुवारी दि.२८/३/२४ रोजी सकाळी फर्दापूर शिव- रारातील शेतात ही घटना उघडकीस आली. वनविभागाच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.शेतकरी विनोद त्र्यंबक बांडे फर्दापूर ता.सोयगाव यांचे फर्दापूर शिवारातील गट नंबर २६५ मध्ये शेत असून शेतातील गोठ्यात त्यांची पाळीव जनावरे बांधलेली असतात. बुधवारी सायंकाळी विनोद बलांडे यांनी नेहमीप्रमाणे शेतातील गोठ्यात जनावरे बांधली व गोठ्याला कुलूप लावून ते घरी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास राखीव जंगलातील बिबट्याने गोठ्याच्या पाठीमागीलं खिडकीतून गोठ्यात प्रवेश केला व एका संकरित गायीच्या वासराला जागीच ठार केले. गुरुवारी सकाळी विनोद बलांडे शेतात आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. अजिंठा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी नीलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनावरु वनपाल एच. एव सय्यद वनरक्षक ए. डी केंद्रे, एस.एस राजपूत यांच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा केला. पशुधन विकास अधिकारी डॉ. लांडगे यांनी वासराचे शवविच्छेदन केले. ४० हजारांचे नुकसान झाले



# पहिली करमुक्त हिंदू-मुस्लिम-बौद्धधर्मीय ऐक्याचे प्रतीक पीरसाईबाबा यात्रोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** येथील हिंदू-मुस्लिम-बौद्द धर्मीय ऐक्याचे प्रतीक असलेल्यापिरसाईबाबांचा यात्रोत्सव दि.२ एप्रिल मार्च ते दि.५ एप्रिल या कालावधीत होणार आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन, तमाशा कलावंतीणीची कलापूर्ण मिरवणूक व हजेरी हे या यात्रेचे वैशिष्ट्ये होत. पिरसाईबाबाहे नेमके हिंदूंचे दैवत की मुस्लिमांचे हा वाद न घालता हिंदू-मुस्लिम धर्मीय एकोप्याने यात्रोत्सव साजरा करतात. पिरसाईबाबाग्रामदैवत तसेच सर्व जातीधर्माचे श्रद्दास्थान असले तरी देखभाल व पूजा-अर्चा मुस्लिम समाजाकडे आहे. सन १९६५-६६ च्या दरम्यान कै.वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळातील अन्न आणि नागरी पुरवठा कॅबिनेट मंत्री मा.तल्यारखान यांनी शिरवाडे गावास भेट देऊन सर्वधर्मीय ऐक्य बघुन गौरव केला होता. या यात्रेचे वैशिष्ट्ये म्हणजे संदलच्या दिवशी प्रत्येक घरी नवीन गव्हाचे कणिक, गूळ, तूप यांच्यापासून "मलिदा" बनविला जातो, पिरसाईबाबांना हाच मलिदा प्रसाद म्हणून दिला जातो. निफाड तालुक्यात नैताळे पाठोपाठ सर्वात मोठी भरणारी ही यात्रा परंतु कालौघात टांगा शर्यती आता बंद झाल्या आहेत. मात्र खेळणी विक्रेते, रहाट, मिठाई विक्रेते मोठ्या प्रमाणावर हजेरी लावतात. ही यात्रा संपूर्ण करमुक्त असून ग्रामपंचायत दुकानदारांकडून कुठलाही कर घेत नाही. यात्रेनिमित्त बाहेरगावी असलेले नागरिक तसेच चाकरमाने गावी येतात. यात्रोत्सवानिमित्त येथील दलित ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात पशुहत्या (बोकडबळी) दिले जात असे मात्र येथील नागरिक व मुंबई येथील बौद्धाचार्य काशिनाथ धनराव यांच्या पुढाकाराने व दलित ग्रामस्थांनी सामंजस्य दाखवत पशुबळी बंद केली आहे. नागरिकांचा व विक्रेत्यांचा वाढता प्रतिसाद बघता तीन दिवस चालणारी यात्रा चार दिवस भरते. यात्रोत्सवानिमित्त बारागाडया ओढणारे बाळा चिताळकर हे घटी बसले आहेत. या निमित्ताने नियमित रात्रौ जागरण गोंधळ, दि.२ एप्रिल रोजी सवाद्य संदल मिरवणूक, दि.३ एप्रिल रोजी सायंकाळी खंडेराव भक्त बाळा चिताळकर यांचा बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम, दि. ४ एप्रिल रोजी संगीता पुणेकर यांचा लोकनाटय तमाशा, दि. ५ एप्रिल रोजी सकाळी तमाशा कलावंतीणीची हजेरी आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील भाविक, दुकानदार, तमाशा रसिक यांनी यात्रोत्सवास उपस्थित रहावे असे आवाहन यात्रा कमेटी, ग्रामस्थांनी केले आहे.



# खबऱ्या असल्याचा आरोप करीत माओवाद्यांकडून हत्या

## गडचिरोलीत राष्ट्रीय महामार्गावर टाकला मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रकांत पतरंगे**

**गडचिरोली :** पोलिसांचा खबऱ्या असल्याचे सांगत माओवाद्यांनी एका आदिवासी इसमाची हत्या केल्याची घटना आज पहाटेच्या सुमारास उघडकीस आली आहे. अशोक तलांडे (रा. दामरंचा, ता. अहेरी) असे हत्या झालेल्या इसमाचे नाव असून या घटनेने ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिसरात दहशत निर्माण झाली आहे. मृतदेहाजवळ काही पत्रके आढळून आले. गडचिरोली जिल्यातील आलापल्ली ते भामरागड या राष्ट्रीय महामार्गावरील ताडगाव वरून जवळपास पाच ते सहा किलोमीटर अंतरावर अशोक तलांडे यांचा मृतदेह आढळून आला आहे. विशेष म्हणजे मृतदेहाजवळ काही पत्रके आढळून आले असून त्यात अशोक हा पोलिसांचा खबऱ्या असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. अशोक तलांडे याला अनेकदा सुधारण्याची संधी दिली होती. त्याच्या घरच्यांना आणि नातेवाईकांना सुद्धा सुधारण्यास सांगण्यात आले. मात्र तो सुधारला नाही. त्यामुळे जन अदालत मध्ये त्याला शिक्षा देण्यात आली असून याला एक ठाणेदार जबाबदार असल्याचा उल्लेख देखील त्या पत्रकात करण्यात आला आहे.

भामरागड तालुक्यातील ताडगाव येथील अशोक तलांडे हा मूळचा दामरंचा येथील रहिवासी असला तरी तो मागील काही दिवसांपासून आपल्या पत्नी सोबत भामरागड तालुक्यातील ताडगाव परिसरात राहत होता. अशोक हा अत्यंत गरीब असून मोलमजुरी करून उदरनिर्वाह करायचा.

त्याच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असल्याची माहिती आहे. सदर व्यक्ती केव्हा पासून घरून बेपत्ता आहे याची माहिती कळू शकली नाही. मात्र, अशोक हा पोलिस खबरी नसल्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले आहे. या घटनेचा तपास ताडगाव पोलीस करीत असून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण झाली आहे.

माओवादी कोऱ्या कागदावर लाल रंगाने लिहिलेले पत्रक वापरतात. मात्र, घटनास्थळावर आढळलेले पत्रक हे वहीच्या पानावर लिहिलेले होते. बाल पेनी ने लिहिले पत्रकात खाली पेरमिली एरिया कमिटी भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) मार्च २०२४ असा उल्लेख आहे हे विशेष...

# अवघ्या २४ महिन्यांत आंब्याच्या झाडांना लागली मोठ्या प्रमाणात फळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुनील कुलकर्णी**

**शिर्डी प्रतिनिधी :** शिर्डी लगतच्या सावळीविहीर परीसरातील प्रगतशील शेतकरी सुनील कुलकर्णी व संजय कुलकर्णी यांनी अंगत्य क्रृषी पर्यटन केंद्राच्या २० गुठ्ठे जमिनीवर त्यांनी असलेल्या श्रेत्रातील परीसरात ५० आंबा झाडाची लागवड केली होती अवघ्या २४ महिन्यात या झाडांना मोठ्या प्रमाणावर कै-याची फळे लागलेली दिसत असून यात लंगडा वनराज केशर राजापुरी जातीच्या गोड रसाळ व जास्त वजन असलेल्या व जास्त आयुष्यमान असलेल्या झाडाचा यात समावेश असून शेती व्यवसायात खात्रीशीर उत्पन्न यातून शेतकऱ्यांना मिळु शकतो असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

कुलकर्णी म्हणाले की २४ महिन्यात मोठ्या प्रमाणावर कैरीचे फळे लागलेली असून चवीला गोड आहे या झाडाचे आयुष्यमान पाणी खत औषधे व देखभाल यावर उत्पन्न अवलंबून असते त्या झाडाना शेणखत टाकण्यात आले



आहे पाण्याचा निचरा होत असलेल्या जमिनीवर हि झाडे झपाट्याने मोठी होतात एका कैरीचे वजन ७००ग्रॅमच्या आसपास आहे हि झाडे बघण्यासाठी अनेक शेतकरी या ठिकाणी भेट देत आहे कुलकर्णी या कुंटबानी या परिसरात शेतीवर विविध प्रयोग करुन नाविणपुर्ण शेती करत उत्पन्न घेऊन आदर्श निर्माण केला असून त्या कार्याबद्दल विविध पुरस्कार देखील देवुन त्याच्या कामाची दखल शासकीय यंत्रणेने घेतली आहे.

# तीव्र उन्ह-उकड्याने नागरिक प्राण्यांचे हाल


आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मार्च महिन्याच्या शेवटीला कडक तीव्रता चे ऊन व उकड्याने अंगाची लाही लाही होत असुण दैनंदिन जीवनावर व व्यवसायांवर मोठा परिणाम झाल्याचे चित्र आहे. एप्रिल/ मे महिना पुढेच असताना मार्चच्या शेवटच्या टप्प्यात सुर्य आग ओकत आहे. सकाळी दहा नंतरच तीव्र कडक उन्ह तर दुपारी बाहेर निघणे शक्य होत नाही असी अवस्था उन्हाची सद्या सुरु आहे. कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत आहे. तर उन्हामुळे दैनंदिन जीवन तथा कामे व्यवहारावर परिणाम झाला आहे. दुपारी रस्ते गाव जंगल निर्मनुष्य व प्राणीपक्षी मुक्त, वहानमुक्त दिसून येत आहे.गुरेप्राणी पक्षी तीव्र उन्हामुळे सैरभैर करत सावली गाठत आहे तीच स्थिती नागरिकांची आहे.अतितीव्र उन्हामुळे चक्कर येणे डोळे जळजळ करणे ताप येणे शरिर गरम होणे आदि आणी अन्य समस्या उदभवत आहे.तीव्र उन्हामुळे कुठलेच काम करणे शक्य होत नाहीय.

# आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाला फायदा होणार नाही याची खबरदारी घ्या : शिवसेना संपर्कप्रमुख माजी आ. चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** देशासह महाराष्ट्रात होऊ घातलेल्या लोकसभा



निवडणुकीत महाविकास आघाडी कडून वंचित बहुजन आघाडीला जागा लढण्यासंदर्भात पूर्वी चार जागांचा प्रस्ताव देण्यात आलेला होता. यावर आंबेडकरांची नाराजी पाहून पाच जागेचा प्रस्ताव देण्यात आला तरीही बाळासाहेब आंबेडकर समाधान नसल्याने दिसून येत आहेत.लोकशाही जिवंत ठेवायची असेल,महायुतीला टक्कर द्यायची असेल, बहुजन समाजाच्या मताची विभागणी होऊ नये हे महत्त्वाचे आहे.आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाला फायदा होणार नाही याची बाळासाहेब आंबेडकरांनी खबरदारी घ्यावी असे पत्रकारांशी बोलतांना शिवसेना उबाठा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी केले. अगोदरच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाजाचा रोष शिंदे फडवणीस सरकार वर रोष आहे.बेरोजगारी,महागाई सह ईडी, फोडाफोडी चे मुद्दे चर्चिले जात आहेत.जनतेत प्रचंड प्रमाणात युती सरकारविरोधात संतापाची लाट पसरली आहे. मराठा समाजाच्या मताचे विभाजन होऊन त्याचा प्रत्यक्ष फायदा महायुतीला होवू नये. नुकतीच दि.(२७) रोजी आंतरवाली सराटी येथे वंचित बहुजन आघाडी चे प्रमुख बाळासाहेब आंबेडकरांनी मनोज जरांगे पाटील यांच भेट घेतली खरी परंतु यंदाची निवडणूक राजकीय दृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा उमेदवार उभे केले तर याचा सुद्धा प्रत्यक्ष फायदा महायुतीला होणार नाही याची खबरदारी घेवून भुमिका घ्यावी असेही पुढे बोलताना शिवसेना नेते माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले. देशाचे संविधान वाचवायचे असेल तर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भुमिकेला थोडे फार बदलून आघाडीच्या भावना समजून घ्याव्यात असे पत्रकारांशी बोलताना चव्हाण यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीमध्ये प्रत्येक लोकसभा मतदारसंघात एकच उमेदवार उभा केल्यास त्याचा लाभ महायुतीला च्या उमेदवाराला होईल त्यामुळे मराठा उमेदवार निवडून तर येणार नाही पण उगाच पाडापाडीचे खापर फुटेल जरांगे पाटील यांच्या विविध निर्णयामुळे मराठा कार्यकर्ते संभ्रमात आहेत असेही अनेक राजकीय जाणकार मत व्यक्त करत आहेत. तसेच मनोज पाटील जरांगे,बाळासाहेब आंबेडकर,प्रकाश शेंडगे यांची होत असलेली संभाव्य तिसऱ्या आघाडीची स्थापना म्हणजे अप्रत्यक्ष भाजपला मदत करण्यासारखे असल्याचे ही चर्चिले जात आहे.

# नाथषष्ठीनिमित्ताने पुढील सर्वच उत्सव एकत्रित करणार साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या कित्येक वर्षांपासून पैठण येथील संत एकनाथ महाराज वशंज प्रत्येक नाथषष्टी आसो कि पालखी सोहळा असो नेहमी नाथवंशज दत्तकपुत्र पालखीवाले पांडव तसेच नाथवंशज गोसावी यांच्यात मानापानामुळे वाद होत असत त्यामुळे काही वाद कोर्टातही गेले परंतु दोघापैकी कोणीच मागे घेत नसत परंतु आता यंदा संत एकनाथ महाराज समाधी षष्ठी सोहळ्याचे ४२५ शतक्कोत्तर वर्षेच्या निमित्ताने संस्थानामधे असलेले आम्ही दोन प्रमुख घटक संस्थानाधिपती नाथवंशज रावसाहेब महाराज गोसावी व दिंडी व पारंपरिक वारकरी फड प्रमुख रघुनाथबुवा पालखीवाले दोघांनी विचार विनिमय करून या वर्षीच्या उत्सवापासुन सर्व मतभेद ,वाद,विवाद,भांडण तंटे बाजुला सारून संस्थानच्या शेकडो वर्षाच्या परंपरा एकत्रित साजरे करण्याचे ठरले आसुन गोसावी व पालखीवाले,पांडव आता एकत्र आले असुन यापुढे आमचा कोणताही वाद राहणार नसल्याचे संस्थानाधिपती नाथवंशज काला दहीहंडीचे मानकरी रावसाहेब महाराज यांनी पत्रकार परीषदेत स्पष्ट केले. तसेच यापुढे षष्ठी सोहळ्यातील सर्वच धार्मिक व परंपरेने दोघेही एकत्रित साजरा करणार आहेत. तसेच परंपरा नुसार यंदा ची काला दहीहंडी संस्थानाधिपती नाथवंशज रावसाहेब महाराज गोसावी यांच्या हस्ते फोडणार असुन ईथुन दहीहंडीचा मान यांच्या कडेच राहणार आसल्याचे सयुक्तिक सांगण्यात आले. यानिमित्ताने षष्ठी सोहळ्यात सर्वच फडकरी यांनी या सोहळ्यात सामील व्हावे व यंदाची षष्ठी निमित्ताने संत एकनाथ महाराज महापुजा पालकमंत्री तथा एकनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष संदीपान भुमरे याच्या हस्ते करण्यात येणार आसल्याची माहिती रघुनाथ महाराज पालखीवाले यांनी सांगितले.

संस्थान आणि पालखीवाले यांचे वाद आता मिटले असुन राहीलेल्या नाथवंशजानी ही एकत्र यावे अशी भावना पुस्कर महाराज यांनी व्यक्त केला. यापुढे पालखीचे अधिकार पालखीवाले यांच्या कडे व दहिहंडी फोडण्याचा मान रावसाहेब महाराज गोसावी यांच्या कडे राहतील व यंदा या उत्साहाच्या निमित्ताने संस्थानचे वशंज व पालखीवाले दोघेही एकत्रित सगळे उत्सव साजरा करणार असल्याने नाथवंशज पालखीवाले यांच्या वतीने रेखाताई कुलकर्णी ( पालखीवाले यांच्या भगिनी) यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी नाथवंशज पुस्कर महाराज गोसावी,योगेश महाराज पालखीवाले,ज्ञानेश महाराज पालखीवाले,रविंद्र पांडव,रेखाताई कुलकर्णी,श्रीकृष्ण कुलकर्णी यांची उपस्थिती होती.





# लाखो वारकऱ्यांचे पैठणकडे आगमन

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

**पैठण :** रविवारी नाथषष्टी सोहळ्यात दाखल होण्यासाठी मराठवाडा, पच्छिम महाराष्ट्र,विदर्भातुन शेकडो पाई दिंडया भानुदास, एकनाथाचा गजर करत निघाल्या असुन पंचमीच्या दिवशी हे वारकरी नाथनगरीत दाखल होतात. दरम्यान पैठण शहरातच नव्हे तर जवळपासच्या सर्वच गावात शुक्रवारी मुक्काम असतो त्या मुक्कामी दिंड्यातील वारकर्यांना पंचक्रोशीतील गावात पंगती देवुन भोजनाची परंपरा शेकडो वर्षांपासून आजही तितक्याच भक्ती भावाने गावकरी करतात. संभाजीनगर ते पैठण,शहागड आपेगाव मार्गे पैठण,शेवगाव ते पैठण रस्त्यावर शुक्रवारी शेकडो दिंड्या पाई पैठण कडे निघ्याल्या चे चित्र दिसते. या मुळे सर्वच रस्ते तळपत्या उन्हात भानुदास एकनाथाच्या गजराने दुमदुमून गेले.

# चुलत्यास लाकडाच्या दांडक्याने जबर मारहाण करून केला खून

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** क्षुल्लक कारणावरून पुतण्याने चुलत्यास लाकडी दांडक्याने जबर मारहाण केली त्यात चुलता मृत्यू पावला. सदरील घटना दि. २६ रोजी रात्री आठ ते नऊ वाजताच्या दरम्यान घडली. सदरील घटने प्रकरणी सोनखेड पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

लोहा तालुक्यातील राज्य महामार्ग क्र. ५० वरील बोरगांव (की) येथील रहिवाशी असलेले सिध्दार्थ शंकर मल्हारे (वय ४२) यांना दारू पिण्याची सवय असल्याने दारूच्या नशेत त्यांनी दि. २६ रोजी रात्री शेतात गेले व तेथे वडील शंकर मल्हारे हे निवाऱ्यासाठी झोपडी बांधत असताना तू झोपडी का बंधतोस असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. बाप-लेकात वाद सुरू असताना सिध्दार्थ मल्हारे यांनी बाजूलाच आसलेला भाऊ जनार्दन मल्हारे यांना मला खाण्यासाठी कोंबडी दे अशी मागणी केली. कोंबडी दिली नसल्याने मयत सिध्दार्थ मल्हारे हे वडील आणि भावास शिवीगाळ करत होता. त्याच दरम्यान जनार्दन यांचा मुलगा सुमेध जनार्दन मल्हारे हा तिथे येवून अजोबाला का त्रास देतोस आणि वडिलांसोबत का भांडतोस असे म्हणाल्याने त्यांच्यात वाद झाला. रागाच्या भरात सुमेध मल्हारे याने चुलता मयत सिध्दार्थ मल्हारे यांच्या दोन्ही पायांवर, पाठीवर तसेच शरीरावर ठिकठिकाणी लाकडाच्या दांडक्याने जबर मारहाण करून जखमी केले त्यात सिध्दार्थ मल्हारे यांचा मृत्यू झाला. घटने प्रकरणी मयताची मुलगी मनीषा विजय शिनगारपुतळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सोनखेड पोलिसात खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे.

# दहावीची परीक्षा एकदाची संपली विद्यार्थ्यांत जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** वर्षभर अभ्यास शाळेत हजेरी त्यात परिक्षा विविध कार्यक्रम आदिचे ओझे वहात विद्यार्थी कसा बसा होतो व हे सर्व विसरुन सुट्टी चा मनसोक्त आनंद कधी घेतो असं प्रत्येक शालेय विद्यार्थ्यांला वाटतं दि.२६ रोजी दहावीचा वार्षिक परिक्षाचा शेवटचा पेपर होता व पेपर संपताच व परिक्षा खोलीतून बाहेर पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवर एकच आनंद कॅमेऱ्यात कैद करण्या सारखे होते हुश्श संपली परिक्षा एकदाची अशी भावना विद्यार्थ्यांची स्पष्ट दिसून आली.दहावीचा शेवटचा पेपर संपताच विद्यार्थी खोली बाहेर येवून एकण आनंद व्यक्त केला. क्लासमेट मित्र यांच्यासी भेटीगाठी सेल्फी एकच आनंद विद्यार्थ्यांत पाहण्यास मिळाले.दे टाळी,एक सेल्फी तो बनता है असे म्हणत विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला तर सुट्टी चे नियोजन बाहेर कोठे जाणार आदिची चर्चा करतांना दिसले तर अकरावी कोठे कसे क्लासेस आदिची चर्चा विद्यार्थ्यांतून ऐकण्यास मिळाली एकुण परिक्षा एकदाची संपली व ओझे मुक्त झालों याचा आनंद विद्यार्थ्यांतून दिसून आले.तर परिक्षा संपताच घोळक्या घोळक्याने आईस्क्रीम रसपाण नाश्ता पाणी घेण्यात अनेक दिसून आले व टेन्शन खल्लास झाले शिक्षक अभ्यास आईवडिल नातेवाईक यांची सूचना दाबदपट तगादा नसणार यातून काही दिवस तणावमुक्त हर्षोल्लास राहील याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत होता.हे विशेष.

# कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून रबीच्या आवर्तनासाठी उपाययोजना करा : शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** मुळा पाटबंधारे विभागाने चाऱ्यांची दुरुस्ती न केल्यामुळे व कर्मचाऱ्यांचे अपुरे संख्याबळ या कारणास्तव रब्बी आवर्तनासाठी विलंब होत असल्याने शेती पिके करपू लागले आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पाटबंधारे विभागाने कर्मचाऱ्याची तात्काळ संख्या वाढवून ७ नंबर पाणी मागणी अर्ज धारकांना रब्बीचे आवर्तन देण्यासाठी उपाय योजना करा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. तातडीने पाटपाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मागील वर्षी अत्यंत कमी प्रमाणात पर्जन्यमान झाल्याने फेब्रुवारी महिन्यापासूनच विहीर व कूपनलिका यांच्या पाण्याची पातळी खोल गेली आहे. अनेक भागात नागरिकांना पिण्याच्या पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे. दूध व्यवसाय दुष्काळी परिस्थितीमुळे मोडकळीस आला. पशु धनाला चारा उपलब्ध होण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यावर कारवाई करावी तसेच रब्बी हंगामासाठी पाणी अर्ज दाखल करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. शेतकऱ्याना सिंचनासाठी पाणी देण्यासाठी मोठा विलंब होत असल्यामुळे शेतकऱ्याना शेती पिक कशी वाचवावी याची मोठी चिंता झाली असून या विभागाने तात्काळ कर्मचारी संख्या वाढून ७ नंबर पाणी मागणी अर्ज दाखल केलेल्या प्रत्येक शेतकऱ्यांना रब्बी आवर्तनाचे पाणी द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. उशिरा मुळा उजव्या कालव्यातून पाणी सोडून उपयोग होणार आहे. हातातोंडाशी आलेली पिके वाया जाणार आहेत. लवकरात लवकर मुळातून पाटपाणी सोडणे गरजेचे आहे. तरच रब्बीची पिके तग धरतील असे शेतकऱ्यांनी म्हटले आहे.




# किरण साकरकार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अचलपूर :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथील शिक्षिका कुमारी किरण मनोहर साकरकार यांनी लिहिलेल्या 'आई, 'थोरांचे महात्म्य', 'बि-हाडातील आयुष्य', 'चला सुरुवात करूया' या चार पुस्तकांचे प्रकाशन मोठ्या थाटामध्ये उत्साह पूर्ण वातावरणामध्ये पार पडले, यावेळी मल्हारा केंद्राचे केंद्रप्रमुख आदर्श शिक्षक मा. श्रीकृष्ण उघडे, आयएसओ शाळेच्या उच्च श्रेणी मुख्याध्यापिका कु.शीला सोळंके आदर्श शिक्षिका कल्पना चौधरी, आदर्श शिक्षक बबलू कराळे, बबीता पंडित, रश्मी पांनझाडे, दिनकर राऊत, रतिराम मावस्कर तसेच विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या शैक्षणिक कार्याला वाहून घेतलेल्या कुमारी किरण साखरकर यांनी विद्यार्थी यांचा दृष्टिकोन समोर ठेवून हे चारही पुस्तक लिहिलेले आहे या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सामाजिक दृष्ट्या कसा फायदा होईल यासंबंधी सविस्तर या पुस्तकातून सांगितलेले आहे. किरण साखरकर ह्या उपक्रमशील शिक्षिका असून शासन मान्य संस्थेकडून सामाजिक संस्थेकडून त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान सुद्धा करण्यात आलेला आहे. गावचे सरपंच माननीय नारायणरावजी बोरेकार, सर्व सदस्य ग्रामपंचायत मल्हारा, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा सर्व सदस्य यांनी किरण साकरकार यांना शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# शालेय विद्यार्थ्यांनी दाखविले व्यासपीठावर कलागुण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी सह्याद्री इंग्लिश स्कूल अँड जू. कॉलेज, बाजार सावंगीत जलोष सुवर्णयुगाचा मोठया उत्साहात स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी बाजार सावंगी चे सरपंच आप्पाराव नलावडे होते तर कार्यक्रमचे उदघाटन सतीश भाऊ चव्हाण( मराठवाडा पदवीधर आमदार ) यांच्या हस्ते झाले. वेगवेगळ्या गाण्यातून विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांचे प्रदर्शन करून पालकांची मने जिंकली. कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. प्रवीण इंगळे( युवा सेना मित्र मंडळ ), शुक्ला सर( अध्यक्ष,हरियाली फाउंडेशन ),रतिलाल कुचे साहेब( अधीक्षक, कस्टम अँड एक्साईज, भारत सरकार ), अनिल भाऊ चव्हाण, ज्ञानेश्वर बापू नलावडे यांची प्रमुख उपस्थिती होती पत्रकार बंधू इतर मान्यवर व पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सतीश सोळंके, शामल सोळंके, वैष्णवी कुचे, प्रीती खंडागळे, पूजा बनकर, देविका चव्हाण भूषण सर, भाग्यवंत मावशी, घुले अंकल, राऊत अंकल, संदीप अंकल यांनी परिश्रम घेतले. राजश्री अधिकार व पूनम नलावडे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले तर मुख्याध्यापक योगेश कुचे सर यांनी आभार प्रदर्शन करून वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता केली.

# भाईगिरीचा छंद गजाआड करणारा ठरला

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काळे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** आठ दिवसांपूर्वी शिर्डी शहरात सकाळी साडेदहाच्या सुमारास भरवस्तीत वर्दळीच्या ठिकाणी साईलक्ष्मी पार्किंगमध्ये दोन तरुणाच्या भांडणामध्ये गोळीबाराची घटना घडली होती या घटनेची गंभीर दखल घेऊन यातील आरोपी संपत वायकर व जिशान शेख यांना अटक करण्यात आली होती राहता न्यायालयात हजर केले असता ७दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती त्याच्या कडून गावठी कट्टा हस्तगत करण्यात आला असुन तपासात संपत वायकर यांने दुचाकी विकुन २७हजार रुपयात खरेदी केला असल्याचे तपासात पुढे आले असून संपत वायकर हा पिंपळवाडी येथील असून घरची परिस्थिती गरिबीची असुन अल्पवयीन असताना त्याने शरीरा संबधित मारामारी हाणामारी दादागिरीसह भारतीय हत्यार कायद्यासह असे जवळपास १०गुन्हे केलेले असुन नाजुक प्रकरणातून हा प्रकार घडला असुन डोक्यात भाईगिरी ची हवा घुसल्याने कमी वयात त्याच्यावर इतके गुन्हे दाखल असून त्याचा सहकारी जिशान शेख रा शिर्डी याच्यावर पहिलाच गुन्हा दाखल असल्याचे तपासी आधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काळे यांनी सांगितले.

काळे म्हणाले की जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला उपविभागीय अधिकारी शिरीष वमणे पोलीस निरीक्षक रामचंद्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला होता शिर्डीमध्ये गुन्हेगारांनी डोके वर काढु नये यासाठी पोलीस प्रशासनाने पोलीस व जनता यात सुसंवाद वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून त्याचा चागला परीणाम दिसत असुन या आरोपींना ज्यानी आश्रय दिला होता त्याच्या वर देखील कारवाई केली जाणार असल्याचे संकेत पोलीसांनी दिले आहे संपत वायकर हा कोणाच्या सहवासात होता त्याला कोण मदत करत होते त्याला कोणाचे पाठबळ आहे का शस्त्र कोठे खरेदी केले याची माहिती घेतली जात असुन ज्या ठिकाणी गोळीबार झाला त्या घटनास्थळी नेऊन बारीक सारीक माहिती देखील घेण्यात आली असून मंदिरापासून अवघ्या दोन मिनिटांच्या अंतरावर साईलक्ष्मी पार्किंगमध्ये हा गोळीबार झाला होता या घटनेनंतर शिर्डी शहरात खळबळ उडाली होती मात्र पोलीसांनी कमी वेळात या आरोपींना जेरबंद केले होते घटना स्थळावरून पोलिसांनी लाकडी दांडके व बंदुकीच्या गोळीचे अवशेष जप्त केले होत फिर्यादी व आरोपी यांनी शिर्डी व राहता पोलीस स्टेशन मध्ये परस्पर गुन्हे दाखल केले आहे.





# ग्रामविकास अधिकारी मिसाळ यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पंचायत समिती अंतर्गत तालुक्यातील आनेक गावात ग्राम विकास अधिकारी म्हणून काम पाहीलेले श्रीक्षेत्र आपेगावचे भुमिपुत्र जिजाभाऊ बाळासाहेब मिसाळ हे गेल्या काही दिवसात पैठण पंचायत समितीत काम पाहत होते. शासकीय वयोमानानुसार गुरवार दि,२८ रोजी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय कुलकर्णी यांनी शासकीय निरोप देवुन सेवानिवृत्ती बद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी प्रकाश लोखंडे,ग्राम विकास अधिकारी दशरथ खरात, जिजाभाऊ मिसाळ यांना शुभेच्छा दिल्या.

# शिवजयंतीला गालबोट, मिरवणुकीवर दगडफेक

## शहरात तणावपूर्ण शांतता असून मोठा बंदोबस्त तैनात

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** तिथीनुसार साजरी करण्यात आलेल्या शिवजयंतीला नांदुरा येथे गालबोट लागले. मिरवणुकीवर अज्ञात समाजकंटकांनी दगडफेक केल्याने किमान ६ जण जखमी झाले. मध्यरात्रीनंतर गुन्हे दाखल केल्यावर आज शुक्रवारी पोलिसांनी अटकसत्र सुरू केले आहे. गुरुवारी रात्री निघालेली मिरवणूक शांततेत सुरू होती. अंबादेवी गड परिसरातून मिरवणूक सुरू होताच मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. यानंतर समाजकंटक पळून गेलेत. पोलिसांनी परिस्थिती काहीशी नियंत्रणात आणल्यावर मिरवणूक पुन्हा सुरू झाली. मिरवणूक उस्माणीया चौकात आल्यावर मिरवणुकीवर पुन्हा दगडफेक झाली. नांदुरा ठाणेदार विलास पाटील, कैलास सुरळकर घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू होती. मध्यरात्रीनंतर अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. काल रात्री व आज सकाळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही नांदुरा शहराला भेट दिली. शहरात तणावपूर्ण शांतता असून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सीसीटीव्ही फुटेज व अन्य माहितींच्या आधारे अटकसत्र सुरू करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# नागरिकांच्या तक्रारीकरीता निवडणूक निरीक्षक राहणार उपलब्ध : गौडा

## कायदा व सुव्यवस्था, खर्च निरीक्षक जिल्ह्यात दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी होणार असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. तिनही निवडणूक निरीक्षक नागरिकांच्या सुचना / तक्रारी ऐकण्यासाठी वन अकादमी येथे उपलब्ध राहणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

सामान्य निवडणूक निरीक्षक म्हणून मध्यप्रदेशचे अन्न नागरी पुरवठा तथा ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव लोकेशकुमार जाटव (मो.9404912593) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथे त्यांचे कार्यालय 'बकूळ' येथे सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 या वेळेत उपलब्ध राहतील.

कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक म्हणून केरळच्या दहशतवादविरोधी पथकाचे पोलिस अधिक्षक सुजीत दास (मो. 9307274907) हे वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथील 'शाल्मिक' येथे सकाळी 9.30 ते सकाळी 11 पर्यंत उपलब्ध राहणार आहेत.

तर निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया (मो. 9404921146) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी 'बकूल' व्हीव्हीआयपी कक्ष, कौस्तुभ बिल्डींग, वन अकादमी येथे सकाळी 9.30 ते सकाळी 11 वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर